**जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातून घरगुती व औद्योगिक प्रयोजनासाठीच्या बिगर सिंचन पाणी आरक्षणाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१२/(३४३/१२)/सिं.व्य.(धो.)
दिनांक : ०९/१०/२०१२

<u>संदर्भ</u> – १) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १००१/ (१५४/०१/ ) सिंव्य(धोरण) दिनांक २१ जानेवारी २००३
२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम दि..२२ एप्रिल,२०११

<u>प्रस्तावना</u> -

१.० शासनाच्या पूर्वीच्या धोरणानुसार, पिण्याच्या पाण्यासहित सर्व प्रकारच्या बिगरसिंचन प्रयोजनासाठी उदा. उद्योग, औष्णिक विद्युत प्रकल्प, अन्य सिंचनेतर संस्था इ., यांना पाणीआरक्षण द्यावयाचे जे प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे प्राप्त होतात, त्यातील पाण्याचे आरक्षण हे जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांच्या जलाशयातील उपलब्ध पाणीसाठयाच्या १५ टक्क्यांपेक्षा कमी असल्यास, त्यास संबंधित मुख्य अभियंता तसेच हे प्रमाण १५ टक्के किंवा १५ ते २५ टक्के असे असल्यास, त्यास मंत्रालयीन आंतर विभागीय सचिवस्तरीय समितीकडून मान्यता देण्यात येत होती. त्याचप्रमाणे हे प्रमाण २५ टक्के किंवा २५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास, त्यास मा. मंत्रीमंडळाची उपसमिती असलेल्या, मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम वगळून) यांच्या अध्यक्षतेखालील मा. मंत्री उच्चाधिकार समितीकडून मान्यता देण्यात येत होती.

२.० महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०११ यातील कलम ५ मधील १६(क) नुसार <u>जलसंपत्ती प्रकल्पांमधील पाण्याचे क्षेत्रीय वाटप राज्य मंत्रीमंडळाकडून केले जाईल</u> अशी तरतूद करण्यात आली आहे.

यानुषंगाने शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय –

३.० खालील तक्त्यातील रकाना क्र.२ मध्ये नमुद संस्थांना त्यांचे नावासमोर रकाना क्र.५ मध्ये नमूद पाणी आरक्षणास, परिच्छेद ४.० मधील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पाणी आरक्षणाची मागणी करणाया संस्थेचे नांव | पाणी वापराचा प्रकार (औद्योगिक/ घरगुती) | जलाशय/कालवा/नदीचे नांव | मंजूर केलेले पाणी आरक्षण (दलघमी) | सिंचन पुन:स्थापनेचा खर्च (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मे एनर्जिया स्कायआय डेव्हलपर्स, पुणे, मु.पो. भुगाव, ता मुळशी, जि. पुणे | घरगुती | मुळा नदीतून ता. मुळशी जि. पुणे | ०.६० | ८०.८६ |
| २ | मॉंटव्हर्ट रियल इस्टेट प्रा.लि मौ.उरवडे ता. मुळशी, जि. पुणे | घरगुती | उरवडे ल.पा. प्रकल्प ता मुळशी, जि. पुणे | ०.१९२८ | २६.३१ |
| ३ | वरणगांव पाणीपुरवठा योजना ता. भुसावळ जि. जळगांव | घरगुती | हतनूर प्रकल्प ता. भुसावळ जि. जळगांव | १.४३१ | १५० |
| ४ | कठोरा बु., कठोराखुर्द, अंजनसोंडे व फुलगांव पाणीपुरवठा योजना ता. भुसावळ जि. जळगांव | घरगुती | हतनूर प्रकल्प ता. भुसावळ जि. जळगांव | ०.३०८ | ३३ |
| ५ | मलकापूर नगर परिषद वाढीव पाणी आरक्षण प्रस्ताव ता. मलकापूर जि. बुलढाणा | घरगुती | हतनूर प्रकल्प ता. भुसावळ जि. जळगांव | ७.९७ | ८३७ |
| ६ | काष्टी (ग्रामपंचायत) ग्रामीण पाणी पुरवठा योजना ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर | घरगुती | घोड धरण जलाशयातून | ०.६२६ | ८३ |
| ७ | सुमन रमेश तुलसीयानी टेक्नीकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनिअरींग ता. मावळ जि. पुणे | घरगुती/ औद्योगिक | इंद्रायणी नदीतून (मौ. कामशेत ता. मावळ, जि. पुणे) | ०.१३१४ | ३७.१२ |
| ८ | बारामती नगरपरिषद नळ पाणी पुरवठा योजना बारामती, ता. बारामती जि. पुणे | घरगुती | निरा डावा कालवा वीर भाटघर धरण | ४.८८ (वाढीव) | ६२६ |
| ९ | आर्णी शहर पाणीपुरवठा योजना ता आर्णी जि. यवतमाळ | घरगुती | अरुणावती प्रकल्प | २.०७ | ४२० |
| १० | मे. फायर आर्कर इन्फ्रा. प्रा.लि. यांच्या मौ. कोठेवाडा, ता. हिंगणा, जि. नागपूर गृहनिर्माण प्रकल्पास पिण्याच्या पाण्यासाठी पाणी आरक्षण | घरगुती | वेणा नदीतून (कोठेगांव ता. हिंगणा, जि. नागपूर) | ०.५८४ | ० |
| ११ | बाबासाहेब देशमुख शेतकरी सह. सुतगिरणी मर्या. आटपाडी जि. सांगली | घरगुती/ औद्योगिक | गोरडवाडी ल.पा. तलाव ता. आटपाडी जि. सांगली | ०.०१७५<br>०.००४४<br>०.०२१९ | २.६० |
| १२ | नागपूर पेरी अर्बन पाणीपुरवठा योजना ता. कामठी जि. नागपूर | घरगुती | निम्न वेणा प्रकल्प वडगांव जलाशय ता. उमरेड जि. नागपूर | १५ | १५६४ |
| १३ | वाघोली प्रॉपर्टीज प्रा.लि. पुणे मार्फत मौजे वाघोली ता. हवेली जि. पुणे. येथील नगर वसाहत प्रकल्प | घरगुती | मुळा मुठा नदीतून | ०.८७४ | १३१ |

| अ.क्र. | पाणी आरक्षणाची मागणी करणाया संस्थेचे नांव | पाणी वापराचा प्रकार (औद्योगिक/ घरगुती) | जलाशय/कालवा/नदीचे नांव | मंजूर केलेले पाणी आरक्षण (दलघमी) | सिंचन पुन:स्थापनेचा खर्च (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १४ | खातिवली येथे स्मार्ट व्हॅल्यु होम गृह संकुलासाठी पाणीपुरवठा योजना ता. शहापूर जि. ठाणे | घरगुती | भातसा नदी (भातसा प्रकल्प निभावणी साठयातून) | ०.५४७ | ० |
| १५ | मे. पोद्दार डेव्हलपर्स लि. यांचे मौजे सापे ता. अंबरनाथ जि. ठाणे येथील नागरी वसाहत | घरगुती | उल्हास नदीतून | ०.२१९ | ० |
| १६ | वनश्री डेव्हलपर्स कासार आंबोली ता. मुळशी जि. पुणे | घरगुती | उरवडे ल.पा. प्रकल्प | ०.०५२५६ | ७.१७ |
| १७ | भारत निर्माण (स्वजलधारा) योजनेअंतर्गत बेटावद बु|| ता. जामनेर जि. जळगांव | घरगुती | सुर ल.पा. योजना ता. जामनेर जि. जळगांव | ०.०५१४ | ८ |
| १८ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना डोर्ली येथील नविन नळ पाणीपुरवठा योजना ता. जत जि. सांगली | घरगुती | बसप्पावाडी मध्यम प्रकल्प | ०.०८५४ | १२ |
| १९ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत नळपाणी पुरवठा योजना निमज ता. कवठेमहंकाळ जि. सांगली | घरगुती | दुधेभावी ल.पा. तलाव प्रकल्प | ०.०३५५ | ७.१६ |
| २० | ट्रिनिटी लँडमार्क्स एलएलपी भूगाव ता.मुळशी, जि.पूणे | घरगुती/ औद्योगिक | ल.पा.तलाव भूगाव | ०.४८० | १३६.११ |
| २१ | भारत निर्माण योजनेअंतर्गत मौजे मांडवगण व महांडूळवाडी, ता. श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथील पाणीपुरवठा योजना | घरगुती | सीना मध्यम प्रकल्प | ०.२९८ | ४८ |
| २२ | इनाम धामणी नळपाणी पुरवठा योजना ता.मिरज, जि.सांगली | घरगुती | कृष्णा नदीतून | ०.२९८८ | ० |
| २३ | नळ पाणी पुरवठा योजना मडीलगे (बु.) ता.भूदरगड, जि.कोल्हापूर | घरगुती | पाटगांव प्रकल्प, वेदगंगा नदीवरील वाघापूर को.प.बंधारा | ०.१९१४ | ० |
| २४ | सुधार गारगोटी पाणी पुरवठा योजना, गारगोटी, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर | घरगुती | पाटगांव प्रकल्प, वेदगंगा नदीतून | ०.५६९२ | ० |
| २५ | फलटण नगर परिषद फलटण वाढीव नळ पाणी पुरवठा योजना ता. फलटण, जि.सातारा | घरगुती | वीर प्रकल्प जलाशय | ३.९३६ | ३३५.९१ |
| २६ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना डफळापूर, येथील पाणीपुरवठा योजना ता. जत जि. सांगली | घरगुती | बसप्पावाडी मध्यम प्रकल्प | ०.२६८१ | ३७ |
| २७ | मॉटव्हर्ट एलिजन्स लि.मु.पो.भुगांव, ता.मुळशी, जि.पूणे | घरगुती/ औद्योगिक | भूगांव ल.पा.तलाव | ०.०८१४ | २३.०६ |
| २८ | मॉटव्हर्ट एलिजन्स लि.मु.पो.भुगांव, ता.मुळशी, जि.पूणे | घरगुती/ औद्योगिक | मुळा नदीतून | ०.२१६ | २९.११ |
| २९ | जे अँड जे असोसिएटस् प्रमोटर अँड डेव्हलपर्स, मौजे. म्हाळुंगे ता.मावळ, जि. पूणे | घरगुती/ औद्योगिक | मुळा नदीतून | ०.१२२६ | १६.५२ |
| ३० | भोर शहर पाणी पुरवठा योजना ता.भोर, जि.पूणे | घरगुती | निरा देवधर प्रकल्प उ.का.सा.क्र १८/७०० कि.मी. | ०.४३२ | ० |

G:\3rd.GR Water Res.doc.doc

| अ.क्र. | पाणी आरक्षणाची मागणी करणाया संस्थेचे नांव | पाणी वापराचा प्रकार (औद्योगिक/ घरगुती) | जलाशय/कालवा/नदीचे नांव | मंजूर केलेले पाणी आरक्षण (दलघमी) | सिंचन पुनःस्थापनेचा खर्च (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ३१ | आटपाडी एज्युकेशन सोसायटी मु.पो.ता. आटपाडी, जि. सांगली | घरगुती | आटपाडी ल.पा.तलाव | ०.०६५७ | ९.२५ |

४.० उपरोक्त नमूद प्रस्तावांना खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

१) संस्थेने सिंचन कपातीपोटी, सिंचन पुनःस्थापनेचा खर्च रु.१ लक्ष प्रती हेक्टरप्रमाणे अथवा प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी लागू असंलेला शासनाचा प्रचलित दर यापैकी जो जास्त असेल त्या दराने, शासनाकडे करारनामा करण्यापूर्वी जमा करण्यात यावा. या पाणी आरक्षणामुळे सिंचन कपातीपोटी प्राप्त झालेला सिंचन पुनःस्थापना खर्चाची रक्कम ही त्याच प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र पुनःस्थापीत करण्याबाबतच्या योजनेकरिता वापरण्यात यावी. तथापि ग्रामपंचायती आर्थिकदृष्टया सक्षम नसल्याने त्यांच्याकडून सिंचन पुनःस्थापनेचा खर्च घेण्यात येऊ नये.

२) सध्याचे औद्योगिक पाणीपट्टीचे दर पाहता भांडवली अंशदान न घेता, औद्योगिक दराने पाणी पुरवठा करणे शासनाचे हिताचे आहे. यामुळे संस्थेकडून भांडवली अंशदान न घेता शासनाच्या प्रचलित औद्योगिक दराने पाणीपट्टी वसूल करण्यात यावी.

३) घरगुती पाणी वापराकरिता शासनाच्या प्रचलित दराने पाणीपट्टी वसूल करावी.

४) सर्वसाधारणपणे लघु पाटबंधारे प्रकल्पाचे नियोजन हे आठ महिन्यांकरिता असते. यामुळे उन्हाळयामध्ये अशा प्रकल्पाचे पाणी आटते (अजिबात पाणी नसते). त्यामुळे अपवादात्मक परिस्थितीत पाणीपुरवठा योजनांस इतर कोणताही पाणी स्त्रोत उपलब्ध नसल्यास त्यास मंजुरी देण्यात येते. तथापि, अशा मंजुरी दिलेल्या पाणीपुरवठा योजनेस उन्हाळयामध्ये पाणी मिळेलच याची शाश्वती देता येत नाही. याकरिता आवश्यक तो साठा संस्थेने करणे गरजेचे आहे.

५) संस्थेची मागणी ही प्रस्तावित नागरी वसाहत उभारण्यासाठी असल्यास संस्थेकडून प्रत्यक्ष लोकवस्ती निर्माण होईपर्यंत संपूर्ण पाणीवापरास औद्योगिक दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी व लोकवस्ती पूर्णतः निर्माण झाल्यावर घरगुती पाणीवापरासाठी घरगुती दराने व औद्योगिक पाणी वापरासाठी औद्योगिक दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी.

६) संस्थेने आपत्कालीन परिस्थितीत स्वत:ची पर्यायी व्यवस्था करावी. उद्‌भव ठिकाणी पाण्याअभावी किंवा आपत्कालीन परिस्थितीत संस्थेस पाण्याची गरज भागविण्यासाठी ६० दिवस पाणी पुरेल इतक्या क्षमतेचा साठवण तलाव स्वखर्चाने बांधावा. तसेच या कालावधीत पाणी उपलब्ध नसल्यास जलसंपदा विभागाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

७) बहुतेक उद्योगांना त्यांचे उत्पादन सुरु करण्यास आरंभ काळ ( Gestation Period ) लागतो. सर्वसाधारणपणे या कालावधीत संस्था करारनामा करण्यास टाळते अथवा संस्थेसोबत बिगरसिंचन करारनामा केला असला तरीही शासनास कोणतीही पाणीपट्टी प्राप्त होत नाही. तथापि संस्थेने पाणी आरक्षण केलेले असल्यामुळे त्यांच्याकडून पाणीवापर होत नसूनही ते इतर अर्जदारांना सुद्धा देणे शक्य होत नाही. यामुळे शासनास मोठया महसुलास मुकावे लागते, ही बाब विचारात घेता, अशा पाणी आरक्षण प्रस्तावास मान्यता देतांना, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यासाठी ठोक पाणी प्रशुल्क निकष, भाग ३ मधील परिच्छेद १३.४ (पाच) मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

जलसंपदा विभागाशी करारनामा करतांना बिगर सिंचन पाणी वापरकर्ते अंतिम पाणी मागणी प्रमाणे टप्प्याटप्प्याने पाणी वापर करण्याचे नियोजन नमूद करु शकतील. अंतिम पाणी मागणी प्रमाणे पुरवठा सुरु होईपर्यंत वर्षनिहाय खालीलप्रमाणे आकारणी करण्यात येईल.

अ) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या प्रमाणात पाणीवापर असल्यास लागू दराने आकारणी.

ब) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या पाणीवापरापेक्षा $\pm$ १०% पाणी वापर(अधिक/कमी) झाल्यास, फरकाच्या वापरास दंडनीय दर लागू दराच्या १.५ पट.

क)उर्वरित प्रमाणाकरिता म्हणजे अंतिम नियोजित पाणी वापर वजा टप्प्यानुसार नियोजित पाणी वापराकरिता, बांधिलकी/लेखबध्द आकार लागू दराच्या ५ टक्के वार्षिक दराने आकारण्यात येईल.

८) संस्थेने सांडपाण्यावर शुध्दीकरण प्रक्रिया करणारी यंत्रणा बसवावी. तसेच या बाबतच्या सविस्तर प्रस्तावाची माहिती जलसंपदा/पर्यावरण विभागास विहित कालावधीत म्हणजेच करारनामा करतेवेळी देणे आवश्यक आहे. अन्यथा पाणी आरक्षण रद्द होईल.

९) संस्थेस प्रथम पाणी वापर करण्यास परवानगीचे इरादापत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) देण्यात यावे व करारनामा करण्याकरीता ३ महिन्यांची मुदत ठेवावी. करारनामा झाल्यानंतरच प्रत्यक्ष पाणी परवाना

दिल्याचे ग्राह्य मानण्यात येईल. संस्थेने सदर करारनामा विहित मुदतीत (३ महिन्यांच्या आत) न केल्यास संस्थेचे पाणी आरक्षण आपोआप रद्द होईल.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०४/२०१२/व्यय-१२, दिनांक ३/७/२०१२ अनुसार प्राप्त झालेल्या सहमतीने तसेच नगर विकास विभाग व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१२१००९१७०९५९१२२७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र.गो.मांदाडे)
शासनाचे उप सचिव.

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव.
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
सर्व महासंचालक, जलसंपदा विभाग.
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
निवडनस्ती कार्यासन सिंव्यधोरण.

G:\3rd.GR Water Res.doc.doc